

रुपेरी पडद्यावरचं सहजसुंदर व्यक्तिमत्त्व नूतन

नूतन म्हणजे सहजसुंदर अभिनयाचं दुसरं नाव. २४ जून रोजी येणाऱ्या तिच्या जयंतीनिमित्त या गुणवान अभिनेत्रीच्या जीवनातील काही यादगार प्रसंगांची उजळणी.

□ अजित पोपट

नूतनची ओळख आजच्या पिढीला मोहनीश बहलची आई अशी करून द्यावी लागेल. या पिढीला हे ठाऊक नसेल एकेकाळी याच अभिनेत्रीने आपल्या तरल अभिनयाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केलेय. राज कपूर, देव आनंद, दिलीपकुमार (इच्छा असूनही नूतनला तरुण वयात दिलीपकुमारबरोबर एकही चित्रपट करता आला नाही.) बलराज सहानी, अशोककुमार यांच्यासारखे मातब्बर कलाकार तिला सहजसुंदर अभिनेत्री म्हणत. तिच्या



नगीनातील पौगंडावस्थेतील नूतन

भावप्रदर्शनाची सगळेच तारीफ करायचे.

काही वर्षांपूर्वी बीबीसीवरील एका मुलाखतीत लता मंगेशकरला विचारण्यात आलं होतं की, तुम्ही अनेक अभिनेत्रींसाठी पार्श्वगायन केलंय. तुमच्या गीतांवर सहज अभिनय करणाऱ्या अभिनेत्री किती? लताने तेव्हा दोन-तीन अभिनेत्रींची नावं घेतली त्यामध्ये नूतनचं नाव पहिलं होतं. नूतनची घडण तिची आई शोभना समर्थ आणि मोतीलाल यांच्यासारख्या सकस अभिनेत्यांच्या हाताखाली झाली होती हे तिच्या उत्कृष्ट अभिनयाचं रहस्य असावं.

नूतनच्या कारकीर्दीची सुरुवात ती केवळ अडीच वर्षांची असताना झाली. मुंबईतील ताजमहाल हॉटेलात एका पार्टीत तिने डान्स केला होता. दुसरा डान्स प्रोग्रॅम एम्पायर थिएटरमध्ये झाला. नंतर तिने कधीच मागे वळून पाहिलं नाही. नूतन नाईट नावाचा स्टेज प्रोग्रॅम तिने सुरू केला. आज अनेक अभिनेते आपल्या मुलांसाठी चित्रपट तयार करतात. ही परंपरा खरी नूतनपासून सुरू झाली. शोभना समर्थनी आपल्या कन्येला रुपेरी पडद्यावर चमकवण्यासाठी *हमारी बेटी* नावाचा चित्रपट तयार केला होता. त्यानंतर *नगीना* चित्रपटात नूतनने भूमिका केली होती. १९५१ मध्ये बनलेल्या या चित्रपटाला 'ए' प्रमाणपत्र मिळालं होतं. नूतन त्यावेळी केवळ पंधरा वर्षांची होती. नूतन शोभना समर्थबरोबर हा चित्रपट पाहायला थिएटरमध्ये गेली होती. पण डोअरकीपरपासून मॅनेजरपर्यंत सगळ्यांनीच हा प्रौढांसाठीचा चित्रपट असल्याचं सांगून प्रवेश देण्यास नकार दिला.

नूतनची प्रतिभा खऱ्या अर्थाने चमकली *सुजाता* (१९५९) या चित्रपटाने. *सुजाता*नंतर नूतनची गणना स्टार अभिनेत्रींमध्ये होऊ लागली. उत्कृष्ट गायिका, कथक डान्सर, पारदर्शक चेहरा आणि नैसर्गिक अभिनय या गुणांवर नूतनने अडीच दशकं साम्राज्य केलं. खरं तर तेव्हा मीनाकुमारी, मधुबाला, नंदा, वैजयंतीमाला, साधना, वहिदा रहेमान, निम्मी यासारख्या एकाहून एक सरस अभिनेत्री तेव्हा पडदा गाजवत होत्या. त्यांच्या आव्हानाला समर्थपणे तोंड देत नूतन टिकून राहिली. विशेष म्हणजे विवाहानंतरही तिची लोकप्रियता घटली नाही.


१९५९ मध्ये लोकप्रियतेच्या शिखरावर असतानाच लष्करी अधिकारी असलेल्या लेफ्टनंट रजनीश बहलशी विवाह केला. या विवाहावरून आई शोभना समर्थ आणि तिच्यात वितुष्ट आलं. अनेक दिवस अबोलाही होता. 'माझ्या आईने माझे लाखो रुपये खाल्ले' असा आरोप करून नूतनने आईवर कोर्टात खटलाही दाखल केला.

या कौटुंबिक ताण-तणावानंतरही नूतनचा अभिनय दिवसेंदिवस बहरतच होता. समोर कितीही सशक्त अभिनेता असला तरी नूतन कधीही कमी पडत नसे. उदाहरण सांगायचं तर बलराज सहानीबरोबर *सीमा* (सुनो छोटीसी गुडिया की लंबी कहानी...' आणि 'मनमोहना बडें छूटे...') देव आनंदबरोबर *तेरे घर के सामने*, अशोककुमारसमवेत *बंदिनी* ('मोरा गोरा रंग लई ले...' आणि 'अब के बरस...') राज कपूरसमवेत *अनाडी* आणि *दिल ही तो है*, सुनील दत्तसमवेत *सुजाता* आणि *मिलन*, किशोरकुमारबरोबर *दिल्ली का ठग*, गोविंद सरय्याबरोबर *कुसुम* आणि *सरस्वतीचंद्र* आणि विजय आनंदसमवेत *मैं तुलसी तेरे आंगन की* वगैरे. दिलीपकुमारसमवेत तरुणपणी एकही चित्रपट करता आला नसला तरी चरित्र भूमिकेत *कर्म*मध्ये दोघांनी एकत्र काम केलं.

विशेष म्हणजे पडद्यावर बहुतेक वेळा तरल, हृदयस्पर्शी अभिनय करणारी नूतन प्रत्यक्षात आजच्या अभिनेत्रींहून बिनधास्त










१ थोडं मॉडेलिंग करते...

२ *हमारी बेटी*मध्ये तनुजासमवेत

३ *सुरत आणि सीरत*मध्ये दिग्दर्शक पती रजनीश बहल समवेत

४ *सोने की चिडिया*मध्ये नूतन आई शोभनासमर्थसमवेत
















१ शम्मी कपूरसमवेत

२ *सरस्वती चंद्र*ची कुमूद

३ *तेरे घर के सामने*मध्ये देव आनंदबरोबर

४ *सुजाता*मध्ये सुनील दत्तसमवेत

५ *नाजुक नार* नूतन

६ *बंदिनी*मध्ये धर्मेंद्रसमवेत: प्रेमाचा ज्वर कुठवर?

७ *सीमा*च्या क्लायमॅक्समध्ये बलराज सहानीबरोबर

आणि बंडखोर होती. १९५२ मध्ये तं
गेली होती. योगायोगाने तेव्हा तिथे
होती. नूतनने या स्पर्धेत भाग घेतल
'मिस मसुरी' बनली. *दिल्ली* क
चित्रपटात पहिल्यांदा स्विमसूट परि
तिने खळबळ माजवली. ही तब्बल
गोष्ट आहे. अर्धवट राहिलेल्या एका
चित्रपटात नूतनने मिनी फ्रॉकही परि
होता. खाजगी जीवनात तिचे अशो
चांगले सूर जुळायचे. दोघं खूप
स्वभावाचे. विनोद सांगण्याचा दोघ
नूतन नकलाही चांगल्या करून दा

अशोककुमार यांनी 'जी'ला दि
मुलाखतीत नूतनचा एक किस्सा
होता. *बंदिनी*च्या वेळी नूतन आपल्या
इतकी एकरूप झाली होती, की तिचा
पाहताना एक-दोन वेळा मीच संवाद
बिमलदांनी मला 'काय चाललंय?' अ
तेव्हा नूतनचा अभिनय पाहून
झाल्याचं कबूल केलं. ते ऐकून सेट
हसले.

एक प्रसंग खुद्द नूतनच आपल्या
पत्रकारांना सांगायची, 'लहानपण
नकलांची आवड. एकदा मी
मोटारीतून चालले होते. मम्मी
दरवाजा उघडा राहिला होता. सम
मोटारीतील गृहस्थाने मम्मीला
केला तेव्हा मम्मीने चालत्या मोटारी
उघडून व्यवस्थित बंद केला. ते पा
स्फुरण चढलं. मीदेखील मोटारी
उघडला. पण तो नेमका किती उघड
अंदाज नसल्याने तो पूर्ण उघडला
मी जवळजवळ मोटारीबाहेर गेले

हा किस्सा सांगून नूतन हसायची
नटखट असली तरी तिला
भूमिका अधिक आवडायच्या. सुज
बंदिनी या तिच्या खास आवडीच्या
असायच्या.

१९८० मध्ये कॅन्सरचं निदान
नूतन अध्यात्माकडे वळली. ती भजन
स्वरबद्ध करायची आणि गायची. न
भेटणंही तिने कमी केलं होतं.
ती झुंजली. ही झुंज १९९२
सहजसुंदर अभिनयासाठी मशहू
रुपेरी पडद्यावरचं व्यक्तिमत्त्व
काळाच्या पडद्याआड गेलं.